पाक्षिक | शेतकरी संघटक | वर्ष ११ वे
वार्षिक वर्गणी रु. ३० | | अंक १७ वा
किंमत १ रुपया २५ पैसे | | ६-२१ जानेवारी १९९५

## शेतकरी संघटनेची निवडणूक भूमिका फेब्रुवारी १९९५

# पिशाच्च महाल उद्ध्वस्त करण्यासाठी....

गोऱ्या इंग्रजांपासून स्वतंत्र झालेल्या भारतामधील काळ्या इंग्रजांची राज्यव्यवस्था हा 'पिशाच्च महाल' आहे आणि या पिशाच्च महालामध्ये, निढळाच्या घामाने आपले व आपल्या मुलाबाळांचे पालन-पोषण करण्यासाठी धडपडणाऱ्यांना देशातील शेतकरी, कारागीर, व्यावसायिक यांना लुटण्याचेच डाव रचले जातात हे आता सिद्ध झाले आहे. या पिशाच्च महालाच्या ऐषआरामात रमणारे आपल्यातलेच आमदार-खासदार किंवा विरोधी पक्षांतील इच्छुक आमदार-खासदार शेतकरी संघटनेच्या सुरवातीच्या काळांत 'शेतीमालाला रास्त भाव' या कल्पनेला हसत होते. शेतकरी संघटनेच्या रोपाचा जसजसा वृक्ष बनू लागला तसतशी ही मंडळी शेतीमालाच्या रास्त भावाची कल्पना मान्य करू लागली आणि मनांत नसले तरी पुढे त्याचा आग्रहाने घोषही करू लागले.

'शेतीमालाला रास्त भाव न मिळणे' हे शेतकऱ्यांच्या, आणि कारागीर-व्यावसायिकांच्या दारिद्र्यामागच्या कारणाचे अगदी प्राथमिक असे दृश्यस्वरूप होय. देशातील जनतेच्या आणि देशाच्या दारिद्र्याचे मूळ कारण स्वातंत्र्य मिळाल्यामिळाल्या स्वातंत्र्य लढ्यामागील राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या विचाराला केराच्या टोपलीत टाकून बहुसंख्य उद्योजक-श्रमिकांना लुटून मोजक्या ऐतखाऊंची चंगळ होईल अशा प्रकारची अर्थव्यवस्था 'समाजवाद', या नावाने पंडीत जवाहरलाल नेहरू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी देशावर लादली हे आहे. लुटीची ही व्यवस्था पंडीत नेहरू आणि त्यांच्या वारसदारांनी टप्प्याटप्प्यांनी अधिकाधिक आवळत नेली. परिणामी, देशातील श्रमजीवी आणि हुन्नरी लोक दारिद्र्याच्या खाईत गेलेच; पण देशसुद्धा रसातळला पोहाचला.

आणि आता या देशाचे दस्तूरखुद्द सरकार कबुलीजबाब देत आहे की, गेली ४७ वर्षे आम्ही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला रास्त भाव न देवून लुटत आलो आहोत. १९७८-७९ साली शेतकरी संघटना कचरत-कचरत म्हणत होती की, सरकार शेतकऱ्याला दरवर्षी १२,००० कोटी रुपयांना लुटते. गेल्या वर्षी या सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने गॅट या अंतरराष्ट्रीय व्यापार-विषयक संस्थेसमोर लेखी कबुली-जबाब दिला आहे की, शेतीमालाला योग्य भाव न देण्याच्या धोरणाच्या साहाय्याने 'इंडिया'चे सरकार 'भारता'तील शेतकऱ्यांना दरवर्षी २४,००० कोटी रुपये कमी देते.

इतका कबुली-जबाब देऊनसुद्धा सरकार आपली लुटीची धोरणे मागे घ्यायला अजिबात तयार नाही. अशा परिस्थितीमध्ये देशात निवडणुकींची प्रक्रिया चालू झाली आहे. आधी विधानसभेच्या निवडणुका होतील मग लोकसभेच्या. गेल्या १५ वर्षाच्या आंदोलनाच्या आघातांनी खिळखिळा झालेला हा पिशाच्च महाल आणि या पिशाच्च महालाच्या आधाराने लुटालुटीच्या व्यवस्थेत सहभागी झालेल्या आणि त्या व्यवस्थेतून मिळालेल्या ऐषआरामांवर सोकावलेल्या किंवा त्यावर डोळा ठेवणाऱ्या प्रवृत्तींना नेस्तनाबूत करण्याची संधी ४७ वर्षांमध्ये प्रथमतःच मिळत आहे. ही संधी शेतकरी आणि स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांच्या हातून सुटली तर यापुढे आपल्याला आणि आपल्या सगळ्या पुढच्या पिढ्यांना शुद्ध गुलामगिरीतच जगावे लागेल. ही संधी गमावता कामा नये.

ही संधी गमवावी लागू नये म्हणून 'स्वतंत्र भारत पक्षा'चा उदय झाला आहे. एरवी, निवडणुकीला उभ्या राहिलेल्या उमेदवारांपैकी कोणालाही निवडावे तरी लुटालुटीची व्यवस्था चालतच राहते असा आजवरचा अनुभव आहे. निवडणुकींच्या काळात, पर्याय नाही, कर्तव्य आहे म्हणून लोक कोणालातरी मत देतात, कोणीतरी निवडून येतं. पिशाच्च महालात गेलेले सगळेजण साटेलोटे करून सरकार करतात; पिशाच्च महालातून चाललेली लुटालुटीची करणी चालूच राहते. 'स्वतंत्र भारत' पक्षाने यावेळी, नको असलेल्यांतून एकाला निवडून देण्याच्या अगतिकतेतून सर्वसामान्य स्वातंत्र्यप्रेमी कष्टकरी, उद्योजक आणि हुन्नरी. व्यावसायिक नागरिकांना मुक्त करण्यासाठी स्वच्छ असा स्पष्ट पर्याय ठेवलेला आहे. 'स्वतंत्र भारत', पक्षाच्या बांधणीमध्ये शेतकरी संघटनेचा महत्त्वाचा वाटा आहे. या पक्षाने महाराष्ट्रामध्ये दोनशे मतदारसंघांत स्वच्छ चारित्र्याचे, स्पष्ट विचारांचे आणि लुटालुटीची व्यवस्था बंद पाडून प्रत्येक नागरिकाला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य देईल आणि त्याच्या स्वातंत्र्यामध्ये कोणीही बाधा आणणार नाही याची काळजी घेईल अशा प्रकारचे शासन निर्माण करण्यासाठी प्रतिज्ञाबद्ध असलेले उमेदवार उभे केले आहेत.

स्वतंत्र भारत पक्षाने सुरू केलेली ही लढाई कोणा एका व्यक्तिविरुद्ध नाही, कोणा एका पक्षाविरुद्ध नाही, कोणत्या एका स्थानिक मुद्द्यासाठी नाही; ही लढाई आहे सर्वसामान्य नागरिकांना लुटून ऐतखाऊंची चंगळ करणाऱ्या त्या पिशाच्च महालातील व्यवस्थेविरुद्ध.

**— सुरेशचंद्र म्हात्रे**

# 'स्वतंत्र भारत' उमेदवाराचे मतदारांना पत्र

**सप्रेम नमस्कार विनंती विशेष**

मी विधानसभेच्या या निवडणुकीत आपल्या मतदार संघातून लढाईला उभा आहे. या लढाईत उतरण्याचा मला स्वतंत्र भारत पक्षाने आदेश दिला आहे. स्वतंत्र भारत आणि त्याचा कार्यक्रम थोड्या काळात उदंड लोकप्रिय झालेले आहेत. वर्तमानपत्रांमध्ये स्वतंत्र भारत पक्ष हा राजकारणातील तिसरीचौथी ताकद म्हणून त्याची वाखाणणी होत आहे.

तरीही अजून एवढ्या ताकदीच्या पक्षाला कायदेशीर मान्यता मिळायची आहे. 'समाजवादी' या शब्दावर कायद्याचे गाडे अडले आहे. आम्ही म्हणतो समाजवाद झूठ आहे आणि कायदा म्हणतो की समाजवादाची शपथ घेतली तरच मान्यता मिळेल. याची लढाई कोर्टात चालू आहे.

देशाला वाचवू शकेल असा एकमेव पक्ष 'स्वतंत्र भारत' राखीव चिन्ह नाही, दूरदर्शनवर प्रचाराची संधी नाही, इतरही अनेक सवलती नाहीत अशा विषम परिस्थितीमध्ये या लढाईत उतरत आहे. आणि म्हणूनच स्वतंत्र भारत पक्षाचा मी उमेदवार असूनही मी खुले निवडणूक चिन्ह घेऊन लढत आहे. ही लढाई होणारच!

लक्षात घ्या, आपण सगळेच एका संकटात आहोत. असंच चालू राहिलं तर देशाचा कडेलोट अटळ आहे. आमची लढाई देश वाचविण्यासाठी आहे; जात, गट, कारखाना, सोसायटी यांसाठी नाही.

प्रश्न तर अनेक आहेत. गरीबी, बेकारी, महागाई, कर्जबाजारीपणा, लेकीसुनांवरील अत्याचार, गुंडपुंड व पुढाऱ्यांची दोस्ती, भ्रष्टाचार, वशिलेबाजी, जातीजातींतील तंटे, प्रत्येक व्यापारउदीमात लायसन्स्-परमिटचे खोडे अशा सर्व पीडासंकटांनी हरेक माणूस बेजार झाला आहे. या सर्व पीडांमागचा मूळ रोग दुरूस्त झाल्याशिवाय कशातूनही सुटका नाही. रक्तच नासले असेल तर नुसत्या फोडांवर मलम लावून भागत नाही.

हे सगळे कशाने झाले? महात्मा गांधींच्या चळवळीने १९४७ साली देश इंग्रजांच्या मगरमिठीतून सुटला. लोकांना वाटले की आपण स्वतंत्र झालो, आता इंग्रजी अमलातला नोकरांचा जाच संपेल, आपापले शेत, व्यापारउदीम, गाव भरभराटीस येतील, देश पुढे जाईल. हे स्वप्न खरे झाले आहे काय?

दुर्दैवाने, स्वातंत्र्याला ग्रहण लागले. देशाची फाळणी झाली. यादवी पेटली. लढाया, दंगे, दुष्काळ अशी संकटावर संकटे आली. यातून सरकारी पाश आवळत गेला. १९५१ नंतर सरकारी कंपन्यांची मक्तेदारी, नियोजन, शेतीचे शोषण, दुबळ्या कारखानदारीचे भरणपोषण आणि समाजवादी सरकारशाहीची चलती सुरू झाली. स्वातंत्र्यानंतरची सगळी स्वप्ने भकास करणाऱ्या या प्रक्रियेलाच विकास असे नाव पडले. हा सगळा नेहरूंचा खेळ होता. महात्मा गांधींच्या विचारांचा खरा खून तर नेहरूनीतीनेच केला; गोडसेने गांधीजींच्या कुडीवर गोळी चालवली. पुढच्या चाळीस वर्षांत नेहरूनीतीचा खेळ त्यांच्या गोतावळ्यांनी जारी ठेवला.

साऱ्या जगभरात समाजवादाचा पाडाव झाल्यावर भारतातील नेहरूनीतीचे तत्त्वज्ञानही फोल ठरले आहे. आपल्यापुढचे अनेक प्रश्न या चुकीच्या धोरणाचीच विषारी फळे आहेत.

पण, आश्चर्य असे की स्वतंत्र भारत

**स्वतंत्र भारत पक्षाला निवडणूक आयोगाची मान्यता मिळाली नसली तरी स्वतंत्र भारत पक्षातर्फे उभे राहिलेले उमेदवार हे पक्षाच्या ध्येयधोरणांसाठीच निवडणूक लढवीत आहेत. ही लढाई कोणा व्यक्ति किंवा पक्षाविरुद्ध नसून एका व्यवस्थेविरुद्ध आहे म्हणून सर्व उमेदवारांनी आपापल्या मतदारांना एकाच मजकूराचे पत्र लिहिले आहे.**

## नेहरूंनी देशाचे वाटोळे केले

शेतकऱ्याची गरीबी आणि कर्जबाजारीपणा, शेतकऱ्यांना जाणीवपूर्वक लुटल्यामुळे आहे; नेहरूनीतीमुळे आहे. हे शेतकरी संघटनेने पूर्वीच सांगितले. आता ते गॅटला सरकारने दिलेल्या आकडेवारीवरून सिद्ध झाले आहे. जगात सर्वत्र सरकारी हस्तक्षेप जितका कमी तितकी अर्थव्यवस्था चांगली हे सर्वमान्य होत आहे. शेतकरी संघटनेने हे आधीच सांगितलं आहे. सरकारने गरीबी हटू नये म्हणून होणारे प्रयत्न थांबवावेत, गरीबी आपोआप हटेल हे शेतकरी संघटनेने सुरुवातीपासूनच सांगितले. सरकार आवश्यक आहे ते शत्रूंचा आणि चोराचिलटांचा बंदोबस्त करायला. तेवढंच सोडून सरकार सर्व काही करते आहे. डंकेल प्रस्तावावर सही केली आहे. याचा अर्थ, सिद्धान्ततः नेहरूंनी देशाचे वाटोळं केलं आहे, नेहरूवाद चूक आहे, खुल्या अर्थव्यवस्थेला पर्याय नाही हे राज्यकर्त्यांनी कबूल केले आहे. तरीही डंकेल प्रस्तावाचे फायदे शेतकऱ्यांपर्यंत येऊ द्यायचे नाहीत असं धोरण सरकार जाहिरपणे राबवतं आहे. याची अनेक उदाहरणे देता येतील.

**— शरद जोशी**

## दुःख शेतकरी माऊलीचं

*अजुनही जाई*
*माझा बाप अनवाणी*
*अजुनही गाई*
*माझा बाप तीच गाणी*

*ईडापीडा टळो*
*राज्य बळीचं येवावं*
*वामनाला आता*
*पायाखालती घेवावं*

*बळी यावा पोटी*
*आसी करून कामना*
*पुन्हा पुन्हा पोटी*
*कारे येतोस वामना*

**— इंद्रजीत भालेराव**

पक्ष सोडून इतर पक्ष या रोगाकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. या सर्व पक्षांची धावपळ खुर्ची आणि त्यातील सत्ता यांसाठी आहे. गेली सत्तेचाळीस वर्षे देशाची दुर्दशा करणारा काँग्रेस पक्ष आज नेतृत्वहीन बेबंदशाहीत सापडला आहे. तिकडे एका हाताने खुल्या अर्थव्यवस्थेच्या घोषणा करायच्या, गॅट करारावर सही करायची तर दुसऱ्या हाताने कांद्याला निर्यातबंदी, उसाला झोनबंदी आणि कापसाला राज्यबंदी असा उफराटा व्यवहार चालूच आहे.

इतर विरोधी पक्षांचे तर विचारूच नका. त्यांना काय धरायचंय काय सोडायचंय हे उमजत नाही. आणि मग, कुणी मशीद पाडतंय, कुणी जातकारण करतंय, कुणी दोन रुपये किलो तांदूळ देऊन शेतकऱ्याला मारतंय, तर कुणी त्याच्यावर ताण करून दीड रुपया किलो ज्वारी म्हणतंय, तर कुणी झुणका-भाकरीचा हिशोब सांगतंय, कुणी जातीपातींची बेरीजवजाबाकी करतंय. हे सगळं चाललंय निवडणुकीच्या हिशोबानं. असा सगळा विरोधी पक्षांचा तमाशा!

आता यातून देशाला वाचविण्याचं काम श्री. शरद जोशींच्या नेतृत्वाखाली आपल्याला करायचं आहे. या देशात बुद्धिमत्ता आणि कर्तबगारी काही कमी नाही, पण नेहरूव्यवस्थेच्या अंमलात या गोष्टींना काही किंमत राहिली नाही. या विषारी नेहरूव्यवस्थेचे दुष्परिणाम निवारून विकासाची वाट मोकळी करणे हे आमच्यापुढील कार्य आहे. स्वतंत्र भारत पक्षाचा तीस कलमी कार्यक्रम हाच यावरचा मार्ग राहील. जास्त नाही, आम्ही सांगतो, तीन वर्षे पुरतील.

आमच्या कार्यक्रमाच्या अंमलजावणीच्या अगदी पहिल्या आठ दिवसांत स्वतंत्र भारत पक्षाच्या कामाची प्रचिती येऊ शकेल.

- पहिली गोष्ट म्हणजे महाराष्ट्र राज्यात स्वतंत्र भारत पक्षाचे सरकार आले तर आठवड्याभरातच म्हणजे १५ मार्च १९९५ पूर्वी महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांवरील व दारिद्र्य-निर्मूलन कार्यक्रमातील सर्व कर्जे समाप्त करण्यात येतील. १९९५ मध्ये सर्व अनैतिक कर्जाच्या बेड्या तुटलेल्या असतील.
- गुन्हेगारीचा बंदोबस्त
- भ्रष्टाचाराचे उच्चाटन
- लायसन्स्-परमीट-कोटा यांचा व्यापरउदीमातील खोडा काढून टाकणे.
- आधुनिक भारताच्या उभारणीसाठी रस्ते, वीज, दळणवळण, सिंचन, इत्यादी आवश्यक सेवासोयींचा विकास.
- कमकुवत गट / व्यक्तींच्या विकासासाठी विशेष पोषक परिस्थिती निर्माण करणे.

ही झाली केवळ काही कामांची यादी. स्वतंत्र भारत पक्षाने तीस कलमी कार्यक्रमांची रूपरेषा जाहिरनाम्यात विस्ताराने दिली आहे. ती कृपया बारकाईने नजरेखालून घालावी ही विनंती.

या क्रांतीकारी कार्यक्रमाची सुरूवात महाराष्ट्रापासून करायची आहे आणि शेतकरी संघटना व संघटनेची महिला आघाडी आपल्या पाठीशी आहेत. अल्पावधीतच महाराष्ट्र हे कष्टकऱ्यांना आणि उद्योजकांना 'आनंदवनभुवन' वाटू लागेल.

दिनांक : आपला,
२१ जानेवारी १९९५

## फार नको, तीन वर्ष पुरेत

आपण जर ठरवलं तर तीन वर्षात परिस्थिती बदलू शकतो. देश वाचवू शकतो. पण यासाठी या बदलाला राजी न होणारे नोकरशहा, लायसेन्स-परमिट पद्धतीचा फायदा मिळवून कमिशन खाऊन गब्बर झालेले राज्यकर्ते, बंदिस्त बाजारपेठेचा फायदा उठवून गब्बर झालेले उद्योजक, देशाच्या आर्थिक परिस्थितीची सुतरामही जाणीव न ठेवणारे मंदिरवादी, मस्जिदवादी, मंडलवादी हे सर्व देशाचे दुष्मन आहेत हे मनावर पक्के ठसवले पाहिजे.

**– शरद जोशी**

# दुःख शिकत्या शेतकरीपुत्राचं

*मी पाहतो तुझा गाव*
*आणि तू येतोस माझ्या गावाला*
*उगाच नावाला कौतुक करतो आपण*
*एकमेकांच्या आईबापाचं, घरादाराचं*
*चौकटीवर बहीणीनं काढलेल्या*
*मोडक्यातोडक्या मोराचं*
*भाऊ-भावजयांनी रोपलेल्या शेताचं*
*आणि गावकऱ्यांनी केलेल्या स्वगाताचं*
*सगळ्यांची मेटं मोडलेली दिसत असतानाही*

**– इंद्रजित भालेराव**

# कुणी रोविली पहार, गावामध्ये ?

*होते विठूचे मंदीर, होता सोन्याचा पिंपळ*
*होते एकीचेही बळ, गावामध्ये*

*काटा कुणाला मोडला, कोण कशाने रडला*
*कोण धरणी पडला, कळतसे*
*ज्याच्या शेती झाला कुंधा, ज्याचा थकलेला*
*६ । ं द ।*
*त्याचा मिटवून वांधा, गावयकी*

*गाव एक होते सारे, गाव नेक होते सारे*
*बापलेक होते सारे, एकमेका*
*काय झाले एकाएकी, गावामध्ये आली बेकी*
*वैरी झाल्या मायलेकी आता कशा*

*आता देऊळ भंगले, माणसेही दुभंगली*
*सारी सारीच रंगली, भांडणात*
*भल्यासाठी भांडतात, बुऱ्यासाठी भांडतात*
*धुऱ्यासाठी भांडतात, वीतभर*

*आली कशी टोळधाड, झाले रानाचे पहाड*
*डोळा दिसेनाच झाड, सावलीचे*
*कुणी पळवीली छाया, कुणी धाडली दुपार*
*कुणी रोविली पहार, गावामध्ये*

*माय भाकर देईना, बाप भिकेला आडवी*
*पायाखालती तुडवी, जनलोक*
*कुणी यावा भगिरथ, गंगा आणावी गावात*
*आम्ही त्याच्याच नावात, देव शोधू.*

**– इंद्रजित भालेराव**

# तुम्हीच हिशोब करा

**१९८३ ते १९९३ या दहा वर्षांत तुम्ही पिकविलेल्या प्रत्येक क्विंटलमागे**

## इंडिया सरकार तुमचे देणे लागते.

| पीक | उणे सबसिडी टक्के | दहा वर्षांची सरकारी सरासरी किंमत रुपये प्रती क्विंटल | सरकारकडून येणे रुपये प्रती क्विंटल |
|---|---|---|---|
| तांदूळ | – ५३.९२ | २८८.३३ | १५५.४६ |
| भात | – ५३.९२ | १९२.२२ | १०३.६४ |
| गहू | – १०३.२७ | १९२.३३ | १९८.६२ |
| मका | – १२६.५४ | ४३८.२६ | ५५४.५९ |
| तूर | – ५५.७९ | ४३२.२२ | २४१.१४ |
| हरभरा | – ३८.२५ | ३२४.३३ | १२४.०४ |
| उडीद | – ३०.१२ | ४३२.२२ | १३०.१८ |
| मूग | – ४१.९४ | ४३२.२२ | १८१.२६ |
| भुईमूग | – ७१.४० | ५१५.०० | ३६७.७१ |
| सोयाबीन | – ०.४७ | ३४६.९४ | १.६३ |
| कापूस (एच् ४) | – २०५.८२ | ६९८.८९ | १४३८.४३ |
| कापूस (एफ् ४१४/एच् ७७७) | – २०५.८२ | ५८५.६७ | १२०५.४० |
| मोहरी-राई | – ५६.८८ | ४५३.५७ | २५७.९७ |
| ज्यूट (कच्चा) | – १३५.४३ | २३६.६७ | ३२०.५१ |
| तंबाखू | ०.९६ | १२४६.६७ | – १२.०२ |
| ऊस | १४.८५ | २०.१७ | – ३.०० |
| बाजरी | – ९४.३६ | १६४.१७ | १५४.९१ |
| ज्वारी | – ११३.२६ | १६४.९२ | १८६.८० |
| बार्ली | – १९१.४४ | १५०.८८ | २८८.९३ |

केंद्र शासनाच्या वाणिज्य मंत्रालयाने 'गॅट'समोर, देशातील शेतीमालाच्या भावाच्या परिस्थितीला अहवाल सादर केला. त्यातील आकडेवारीवरून व या दहा वर्षांत संबंधित पिकांच्या शासनाने घोषित केलेल्या किंमतीवरून हे कोष्टक तयार केले आहे.

समजा, तुम्ही दर वर्षी सरासरी दोन क्विंटल तूर पिकविता.

म्हणजे, इंडिया सरकार तुमचे दर वर्षाचे

२ × २४१.१४ = ४८२.२८ रु. देणे लागते.

म्हणजे, गेल्या दहा वर्षाचे ४८२.२८ × १० = ४८२२.८० तुमचे सरकारकडून येणे आहे.

याप्रमाणे तुमचा सर्व पिकांचा हिशोब करा आणि त्यांची बेरीज करा आणि

**ठरवा**

कोण कोणाचे देणे लागते ते?

आणि देणेकऱ्याला त्याची जागा दाखवा.

## शेतकरी संघटना एकपक्षीय सरकार देऊ शकते

**प्रा. ना. स. फरांदे**

महाराष्ट्रातील सध्याचे तत्त्वशून्य व तडजोडीच्या राजकारणातील अभद्र युत्यांचे राजकारण पाहता शरद जोशी यांच्या शेतकरी संघटनेचा अपवद वगळता अन्य कोणत्याही पक्षाचे एकपक्षीय सरकार सत्तेवर येण्याची सुतराम शक्यता नाही व त्यामुळे असे कोणतेही सरकार जनतेच्या अपेक्षा पूर्ण करू शकेल असे आपणास वाटत नाही असे स्पष्ट प्रतिपादन विधान परिषदेचे उपसभापती प्रा. ना. स. फरांदे यांनी नुकतेच येथे व्यक्त केले.

कै. रामभाऊ म्हाळगी व्याख्यानमालेच्या समारोप प्रसंगी 'सध्याची राजकीय परिस्थिती' या विषयावर श्री. फरांदे बोलत होते.

*लोकसत्ता दि. १७/१/९५ वरून साभार*

## लेखा-जोखा – सूचना

नागपूर अधिवेशनानंतर सुरू झालेल्या नवीन अभियानातील लेखा-जोखा माहितीपत्रके ज्या जिल्ह्यांचे अधिवेशनाचे हिशोब पूर्ण आहेत त्या जिल्ह्याच्या प्रमुखांना दिलेले आहेत. पूर्ण भरलेले लेखा-जोखा फॉर्म खर्चासाठी लागणाऱ्या रकमेसहित शेतकऱ्याने जिल्हाप्रमुखांकडेच परत द्यावयाचे आहेत. पूर्ण भरलेले फॉर्म केंद्रिय कार्यालयाकडे किंवा इतरत्र कोठेही परस्पर पाठवू नयेत. केंद्र सरकारकडून येणे रकमेची प्रमाणपत्रे जिल्हाप्रमुखां-मार्फतच वितरण केली जातील. या नवीन अभियानात प्रत्येक शेतकऱ्याकडून या प्रक्रियेच्या खर्चापोटी २०/- रु. फक्त आकारले जातात.

## क्षमस्व

काही अपरिहार्य कारणांमुळे ६ व २१ जानेवारी १९९५ चे अंक वेळेवर प्रकाशित करता आले नाहीत, त्याबद्दल क्षमा असावी. या दोन अंकाऐवजी हा जोड अंक प्रकाशित करण्यात येत आहे.

– संपादक

# शेतकरी संघटना
# नागपूर अधिवेशनानंतरचा धावता आढावा

### महिला अधिवेशने

नागपूर अधिवेशनात जाहिर झाल्याप्रमाणे ७ डिसेंबर १९९४ पासून २ जानेवारी १९९५ पर्यंत श्री. शरद जोशी यांचा महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांत दौरा होऊन प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा महिला अधिवेशन भरवून त्यात खुल्या अर्थव्यवस्थेत महिलांचे स्थान, महाराष्ट्र शासनाच्या महिला धोरणातील फोलपणा, नव्या व्यवस्थेत महिलांची राजकीय भूमिका इत्यादी विषयांवर महिलांचे प्रशिक्षण पार पडले. याच दौऱ्यात स्वतंत्र भारत पक्षाची ध्येयधोरणे या विषयी जाहिर सभांतून विश्लेषण करण्यात येऊन समाजातील मान्यवर व्यक्ती तसेच स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांना स्वतंत्र भारत पक्षाच्या कार्यक्रमांत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

### स्वतंत्र भारत बैठक, पुणे

दिनांक २४ डिसेंबर १९९४ रोजी पुणे येथे स्वतंत्र भारत पक्षाच्या महाराष्ट्र शाखेची बैठक होऊन त्यात फेब्रुवारी ९५ मधील निवडणुकांसाठी कार्यक्रम आखण्यात आला. या बैठकीनंतर लगेच झालेल्या, शेतकरी संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीत विधानसभा निवडणुकींच्या काळातील शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली.

### जमीन आमची, भाव आमचा :
### चिखलीतील ठिय्या

दरम्यान, पुणे जिल्ह्यातील चिखली येथे टेल्को कंपनीने शेतकऱ्यांच्या जमिनी पिंपरी चिंचवड महानगर विकास प्राधिकरणाच्या सहाय्याने ताब्यात घेऊन तेथे कंपनीच्या विस्तारासाठी बांधकामास सुरुवात केली. त्याला चिखलीतील शेतकऱ्यांनी प्रखर विरोध केला.

टेल्को कंपनीने शासनाच्या पोलिसांची मदत घेऊन शेतकऱ्यांचा विरोध दडपून टाकायला सुरुवात केली. 'शेतकरी तितुका एक एक' म्हणत महाराष्ट्रातले वीस हजार शेतकरी आपल्या भावांच्या मदतीसाठी चिखलीला धावले व कंपनी जबरदस्तीने बळकावू पाहाणाऱ्या जमिनीवर २५ डिसेंबर १९९५ रोजी ठिय्या देऊन बसले. कडाक्याची थंडी असतानासुद्धा रात्रभर त्या शिवारात शिवाराची राखण करीत महाराष्ट्रभरचे शेतकरी स्त्रीपुरुष ठिकठिकाणी शेकोट्या पेटवून जागत बसले. शेकऱ्यांच्या जमिनीला बाजारभावाप्रमाणे किंमत मिळावी, ज्या घिसाडघाईने कंपनी शेतकऱ्यांची जमिन बळकावू पाहात आहे त्यावरून त्यामागे काहीतरी भ्रष्टाचार असावा तो व त्यात गुंतलेल्यांची नावे जाहिर करावी अशी मागणी आंदोलक शेतकऱ्यांनी केली. अखेर, २६ डिसेंबर रोजी आपण जमीनमालक शेतकऱ्यांशी बोलणी करून मार्ग काढण्यास तयार आहोत व शेतकऱ्यांना मान्य होईल असा मार्ग निघेपर्यंत कंपनी या जमिनीवर काम करणार नाही असा राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा निरोप आल्यामुळे २६ डिसेंबर रोजी श्री. शरद जोशींनी 'ठिय्या' स्थगित केल्याचे घोषित केले. आंदोलनाची समाप्ती होण्याआधी आंदोलनाची आठवण म्हणून या जमिनीवर एक चौथरा बांधण्यात आला. आणि महाराष्ट्रभरचे शेतकरी विजयाचे नारे देत आपापल्या गावी परतले.

चारपाच दिवस उलटल्यानंतर शासनाने विश्वासघात करून कंपनीचे काम सुरू करण्यास परवानगी दिली. महाराष्ट्रभरचे सैनिक शेतकरी स्त्रीपुरुष परत गेले तरी त्यांची हिम्मत चिखली-कुदळवाडीत संक्रमित झाली होती. या आधी घराबाहेर सहसा न पडलेल्या चिखली-कुदळवाडीच्या महिलांनी रणरागिणी बनून शासनाचा, प्राधिकरणाचा व कंपनीचा डाव उधळून लावला. प्राधिकरणाच्या कार्यालयात धरणे धरून एक दिवस कामकाज बंद पाडले, प्राधिकरणाच्या मुख्याधिकाऱ्याच्या घराला वेढा घालून त्याला एक दिवस स्थानबद्ध करून ठेवले.

अखेर शासनाने माघार घेतली व जमिनीच्या किंमतींविषयी बोलणी पूर्ण होईपर्यंत काम केले जाणार नाही असा पुन्हा शब्द दिला. अजूनतरी शासनाने आपला शब्द मोडलेला नाही.

### विधानसभा निवडणूक प्रक्रिया

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, फेब्रुवारी १९९५ ची अधिसूचना निघाल्यानंतर श्री. शरद जोशींचा आणखी एकदा महाराष्ट्रव्यापी धावता दौरा झाला. या दौऱ्यात त्यांनी ९ जानेवारी रोजी हिंगणघाट येथे व १२ जानेवारी रोजी बिलोली येथे आपले उमेदवारी अर्ज दाखल केले. दोनही ठिकाणी हजारो कार्यकर्ते व पाईक हजर होते.

### उमेवादर यादी

एकीकडे भ्रष्ट, गुंडमित्र, लुटारू, सत्ताधारी आणि दुसरीकडे खुल्या व्यवस्थेला उघडउघड विरोध करणारे सर्व विरोधी पक्ष व मूलतत्ववादी यांशिवाय मतदारांना स्वच्छ व स्पष्ट विचारांचा पर्याय येत्या निवडणुकीत देण्याचे ध्येय बाळगून स्वतंत्र भारत पक्षाने महाराष्ट्रातील सर्वच्या सर्व मतदारसंघांत उमेदवार उभे करण्याचे ठरले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांना या मोहिमेत सहभागी करून घेण्यासाठी संपर्क साधण्यात आले. चार-पाच बैठका होऊन दोनशे ठिकाणी महाराष्ट्रातील मतदारांसमोर स्वच्छ व स्पष्ट पर्याय उभा करण्यात स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेला यश लाभले.

परंतु 'समाजवादा'ची खोटी शपथ घेण्यास पक्ष तयार नसल्याने 'स्वतंत्र भारत पक्षा'स राजकीय पक्ष म्हणून मान्यता देण्यास निवडणूक आयोगाने नकार दिला. त्यामुळे स्वतंत्र भारत पक्षाचे हे सर्व उमेदवार तांत्रिकदृष्ट्या अपक्ष उमेदवार म्हणून उभे आहेत. यातील बहुतेकांना 'नांगर' हे निवडणूक चिन्ह मिळाले आहे. या सर्व उमेदवारांनी 'आपण स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहिरनाम्याच्या अंमलबजावणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, कोणत्याही परिस्थितीत इतर पक्षाशी जवळीक साधणार नाही" अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र लिहून दिले आहे.

(पान ११ वर)

# स्वतंत्र भारत पक्ष

## महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, फेब्रुवारी १९९५

# जाहिरनामा

नेहरूवादी समाजवादाचे भयानक दुष्परिणाम भोगत असलेल्या,
कायदा आणि सुव्यवस्था संपूर्ण कोलमडून पडल्यामुळे हबकलेल्या, आणि
राजकीय भ्रष्टाचार, अकार्यक्षमता, गुन्हेगारीकरण, नेता-गुंडा युती यांची कमाल मर्यादा गाठलेल्या
**महाराष्ट्र राज्याचे**
उद्यमी, उन्मेषी, कार्यक्षम अशा सर्वांसाठी
एका नवीन आशास्थानात रूपांतर करण्यासाठी
**स्वतंत्र भारत पक्ष,**
महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रावरील
नेहरूवादी समाजवादाचे विषारी परिणाम रोखण्याचे व नाहीसे करण्याचे
खालील उपाय योजण्यास वचनबद्ध आहे.

**(अ) कायदा व सुव्यवस्था**

१. गुन्हेगारी टोळ्या, दशहतवाद आणि आक्रमक धर्मवेडेपणाचा निष्ठूरपणे निःपात.
२. सर्व सामाजिक कायद्यांच्या अंमलबजावणीस पाच वर्षांची स्थगिती.
३. कालबाह्य कायदे आणि तरतुदी रद्द करण्यासाठी सर्व कायद्यांचे पुनरावलोकन, सध्याच्या कायद्यांचा बुजबुजाट कमी करून फक्त नागरी, गुन्हेगारी, आर्थिक व सामाजिक अशा चारच संहिता निर्माण करण्यासाठी विविध दुरूस्त्या, अधिसूचना, अध्यादेश आणि आदेशांचे एकत्रीकरण.
४. कायद्याच्या ज्ञानाचे गृहीतत्व संबंधित संहितेच्या अत्याधुनिक आवृत्तीपुरतेच मर्यादित राहील अशा रीतीने सर्व संहितांच्या नवीनीकरणाची सुनियोजित कारवाई.
५. सर्व मान्यताप्राप्त न्यायिक निवाड्यांचे संगणकीकरण.
६. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अखत्यारीत, जनतेला उत्तरदायी असलेल्या संरक्षक दलांची स्थापना; अशा संस्थांच्या अंतर्गत वादातच राज्य पोलिसांचा हस्तक्षेप.
७. न्यायिक बाबींमध्ये ग्रामपंचायतींना अधिकार, आणि अशा अधिकारांची सुस्पष्ट व्याख्या.
८. भ्रष्टाचार, बालकांवर अत्याचार, बलात्कार व सार्वजनिक विश्वासघाताच्या गुन्ह्यांसाठी मृत्युदंडाची व जबर शिक्षेची तरतूद.

**(ब) शासनयंत्रणेत काटछाट**

१. प्रशासकीय खर्चात भरीव कपात करण्यासाठी
   अ. मंत्रालये, विभाग व कार्यभारांची समाप्ती, यासाठी
   ब. आस्थापना, कर्मचाऱ्यांच्या सोयी-सवलती आणि कार्यालयीन उधळपट्टी कपात.
   क. प्रशासकीय व सनदी सेवांचे उच्चाटन

२. राज्याच्या एकाधिकाराखाली असलेली सर्व क्षेत्रे व उद्योग, विशेषतः उत्पादन (विशिष्ट प्रकारची संरक्षण उत्पादने वगळता), ऊर्जा निर्मिती, खनिकर्म, सार्वजनिक वितरण प्रणालीसह सर्व प्रकारचे वितरण, देशांतर्गत तसेच विदेशी व्यापार, पर्यटन, हॉटेल उद्योग इत्यादींची स्पर्धेसाठी मुक्तता.

३. 'नाही-रे' च्या हुकूमशाहीऐवजी 'आहे-रें' ची, 'आहे-रें' करिता, 'आहे-रें' द्वारा प्रस्थापित अशा लोकशाहीची प्रतिष्ठापना करण्यासाठी, उद्योगांचे व्यवस्थापन आणि मालकी कर्मचाऱ्यांकडे, उपभोक्त्यांकडे, आणि कच्चा माल व सेवांच्या पुरवठादारांकडे हस्तांतरित करण्याचे दृष्टीने सुनियोजित व परिपूर्ण योजना.

४. निवडक शासकीय कल्याणकारी योजनांचे क्रमशः विसर्जन, आणि त्यांचे सुयोग्य सेवाभावी संस्थांकडे हस्तांतरण.

५. स्वयंसेवी संस्थांच्या विकासकार्यातील वाढत्या सहभागाला अनुसरून राज्याच्या तथाकथित विकास खर्चात योजनाबद्ध कपात.

६. प्रत्यक्षपणे, अथवा सध्या अस्तित्वात असलेल्या सेवांचे खाजगीकरण करून व सध्याचा नोकर वर्ग विकास कार्याकडे वळवून संदेशवहन, दळण वळण सेवा, ऊर्जा, जल, तंत्रज्ञान व संसाधन पद्धतींचा विकास.

७. इ. स. २००० पूर्वी कृष्णेच्या पाण्याचा विनियोग.

**(क) आर्थिक सुधारणा :**

१. राज्याच्या नवीन भूमिकेशी सुसंगत अशा प्रकारे कर्जपातळी कमी करून, राष्ट्रीय कर्जावरील व्याजाच्या बोजात कपात.

२. चालू खर्चासह सर्व सरकारी खर्चाची सर्वंकष तपासणी, सर्व सरकारी कामकाजात आत्यंतिक साधेपणा व बचत. अन्यायी सरकारचे खुऱ्याखुऱ्या लोकसेवक सरकारमध्ये परिवर्तन.

३. शेती व दारिद्र्य निर्मूलनासाठी घेतलेल्या सर्व कर्जांची समाप्ती.

४. नफा, वेतन, भाडे, व्याज यांचे प्रमाण मर्यादित ठेवण्यासाठी बाजारव्यवस्थेवर नजर. उपभोक्त्यांच्या हक्कांना प्राधान्य मिळेल अशी व्यवस्था.

५. करनिर्धारण पद्धतीचे संलग्नीकरण स्थापित क्षमता, खेळते भांडवल, व्यावसायिक वा राहण्याच्या जागेचे क्षेत्रफळ, व ऊर्जा वापर यांच्याशी करून, कर-पद्धती पारदर्शक आणि अ-पक्षपाती करण्याचे दृष्टीने आमूलाग्र सुधारणा. ऑक्ट्राय व विक्रीकरांची समाप्ती.

६. कोणत्याही कर तपासणी अधिकाऱ्यास कोणत्याही नागरिकाचे व्यावसायिक अथवा वैयक्तिक हिशेब मागण्याचा अथवा तपासण्याचा अधिकार असू नये, या तत्त्वाला मान्यता.

७. न्याय, बुद्धी, धर्म अथवा अभिव्यक्तीशी संबंधित कोणत्याही संस्थेचे शासनामार्फत नियंत्रण, दिग्दर्शन अथवा विघटनास बंदी. आपले स्वतःचे भांडवल स्रोत उभारण्यास या संस्थांना अधिकार.

८. उत्पादन परवाने, मालकी, भाडेपट्टी, भाड्याने घेण्या वा देण्यावरील सर्व प्रतिबंध, व्यापार, निर्यात, आयात यांवरील सर्व निर्बंध ज्या दिवशी संपुष्टात येतील अशा 'शून्य नियंत्रण दिवसा' ची लवकरात लवकर घोषणा. यापैकी जे निर्बंध अत्यावश्यक वाटतील ते योग्य तपासणीनंतर व मान्यतेनंतर पुन्हा अमलात आणता येतील.

**(ड) सुधारणेचे उपाय**

१. सफाई, कामगार, वेश्या, गुन्हेगार जमाती व भटक्या जमातींचे पुनर्वसन.

२. सर्व वैयक्तिक संपत्तीत वैवाहिक जोडीदाराचा संयुक्त मालकी हक्क.

३. गत पाच वर्षापासून राजकीय, प्रशासकीय अथवा सहकारी क्षेत्रात अधिकारपद भोगलेल्या सर्व व्यक्तींच्या संपत्तीची जाहिर चौकशी.

★ ★ ★

# स्वतंत्र भारत

## महाराष्ट्र

**शरद जोशी**
राष्ट्रीय अध्यक्ष

**मोरेश्वर टेमुर्डे (पाटील)**
संयाजक - महाराष्ट्र
ससून बिल्डींग
१४३, महात्मा गांधी रोड,
मुंबई - ४०० ००१.

## विधानसभा निवडणूक, १९९५
## अधिकृत उमेदवारांची यादी

| अ.क्र. | मतदार संघ | उमेदवाराचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| १. | २ वेंगुर्ला | श्री. भास्कर वारंग | सिंधुदुर्ग |
| २. | १३ श्रीवर्धन | श्री. सुधाकर दांडेकर | रायगड |
| ३. | १६ अलिबाग | डॉ. अरविंद वामन कुलकर्णी | ★ |
| ४. | १८ खालापूर | ★ श्री. घीसुलाल बाबुलाल परमार | (एकता मंच) |
| ५. | २१ मुंबादेवी | ★ श्री. रायचंद शहा | (एकता मंच) |
| ६. | २३ ऑपेरा हाऊस | ★ श्री. देवजी जेटमल चराळा | (एकता मंच) |
| ७. | २४ मलबार हिल | श्री. सत्यवान बळीराम कदम | |
| ८. | २७ माझगाव | ★ श्री. झोडोब अब्बास सादीवाला | (एकता मंच) |
| ९. | ३२ दादर | श्री. रमाकांत नारायण वेर्णेकर | |
| १०. | ३३ माटुंगा | ★ श्री. अशोक हरिराम ठक्कर | (एकता मंच) |
| ११. | ३६ बांद्रा | डॉ. मनोहर भालचंद्र खेर | |
| १२. | ३७ खेरवाडी | ★ श्री. मधुकर जादवलाल मानकोडी | (एकता मंच) |
| १३. | ३८ विलेपार्ले | ★ श्री. कानजी वालजी शाह | (एकता मंच) |
| १४. | ४२ गोरेगाव | श्री. सोनू कृष्णा सावंत | |
| १५. | ४३ मालाड | ★ श्री. लालाजी गोपाल गाला | (एकता मंच) |
| १६. | ४४ कांदिवली | डॉ. भोलानाथ बावीस्कर | |
| १७. | ४५ बोरीवली | ★ श्री. धनजीबाई हरीभाऊ पटेल | (एकता मंच) |
| १८. | ४९ कुर्ला | श्री. विजय शंकर दुबे | |
| १९. | ५२ मुलुंड | ★ श्री. अनिल अर्जुन ठक्कर | (एकता मंच) |
| २०. | ५३ ठाणे | ★ श्री. मगनलाल खिमजी ठक्कर | (एकता मंच) |
| २१. | ५४ बेलापूर | ★ श्री. भुपतराव ब्रजलाल व्यास | (एकता मंच) |
| २२. | ५६ अंबरनाथ | ★ श्री. वेलजी केदारनाथ वघेला | (एकता मंच) |
| २३. | ५७ कल्याण | ★ श्री. जयकुमार बेलराजी व्यास | (एकता मंच) |
| २४. | ५९ वाडा | ★ श्री. केशव वाल्या नानकर | (श्रमजीवी) |
| २५. | ६० भिवंडी | ★ श्री. प्रेमचंद जुठालाल | (एकता मंच) |
| २६. | ६२ वसई | ★ श्री. विवेक पंडित | (श्रमजीवी) |
| २७. | ६७ नाशिक | डॉ. गिरधर पाटील | नाशिक |
| २८. | ६८ देवळाली | श्री. नंदकुमार साळुंके | |
| २९. | ६९ सिन्नर | श्री. माधवराव आव्हाड | |

| अ.क्र. | मतदार संघ | उमेदवाराचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| ३०. | ७० निफाड | श्री. शिवाजी राजोळे | नाशिक |
| ३१. | ७१ येवला | श्री. संतु झांबरे | |
| ३२. | ७२ नांदगाव | डॉ. दुर्योधन कदम | |
| ३३. | ७३ मालेगाव | श्री. शेख सांडूभाई उस्मान | |
| ३४. | ७४ दाभाडी | श्री. भीमराव जाधव | |
| ३५. | ७५ चांदवड | डॉ. दत्ता कोतवाल | |
| ३६. | ७६ दिंडोरी | श्री. यशवंत पवार | |
| ३७. | ७८ कळवण | श्रीमती सीताबाई बळीराम बागूल | |
| ३८. | ७९ बागलाण | श्री. दिलीप बोरसे | |
| ३९. | ८० साक्री | श्री. शांताराम गांगुर्डे | धुळे |
| ४०. | ८२ नंदुरबार | श्री. रायसिग ठाकरे | |
| ४१. | ८३ तळोदा | श्री. रामलाल ठाकरे | |
| ४२. | ८४ अक्राणी | श्री. रूपसिंग गावीत | |
| ४३. | ८५ शहादा | श्री. कन्हैयालाल पटेल | |
| ४४. | ८६ शिरपूर | श्री. दरबारसिंग गिरासे | |
| ४५. | ८७ शिंदखेडा | श्री. हिरामण चौधरी | |
| ४६. | ८८ कुसुंबा | सौ. प्रमिला भामरे | |
| ४७. | ८९ धुळे | श्री. अब्दुल वहिद अन्सारी | |
| ४८. | ९१ पारोळा | श्री. प्रल्हाद शंकर पाटील | जळगाव |
| ४९. | ९२ अंमळनेर | श्री. चिमणराव पाटील | |
| ५०. | ९३ चोपडा | सौ. इंदिराबाई पाटील | |
| ५१. | ९६ पाचोरा | श्री. रविंद्र पाटील | |
| ५२. | ९३ जामनेर | श्री. रघुनाथ पाटील | |
| ५३. | ९९ यावल | श्री. खुशाल महाजन | |
| ५४. | १०१ एदलाबाद | श्री. दगडू शेळके | |
| ५५. | १०३ बुलढाणा | श्री. हसनराव देशमुख | बुलढाणा |
| ५६. | १०४ चिखली | श्री. एकनाथ थुटे | |
| ५७. | १०५ सिंदखेड राजा | श्री. वामन जाधव | |
| ५८. | १०६ मेहेवार | डॉ. सुरेश हाडे | |
| ५९. | १०७ खामगाव | श्री. गोपालसिंह चव्हाण | |

| अ.क्र. | मतदार संघ | उमेदवाराचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| ६०. | १०८ जळंब | श्री. मधुकर राहाणे | |
| ६१. | १०९ आकोट | प्रा. शरद पाटील | अकोला |
| ६२. | ११० बोरगाव मंजू | श्री. मनोज तायडे | |
| ६३. | १११ अकोला | श्री. जुगलकिशोर बियाणी | |
| ६४. | ११२ बाळापूर | श्री. बलदेवराव पाटील | |
| ६५. | ११३ मेडशी | श्री. पुंडलिकराव गवळी | |
| ६६. | ११४ वाशीम | श्री. मोतीराम राऊत | |
| ६७. | ११५ मंगरूळपीर | श्री. राजू रामकुळ | |
| ६८. | ११६ मूर्तिजापूर | श्री. रावसाहेब कांबे | |
| ६९. | ११७ कारंजा | श्री. गजानन अहमदाबादकर | |
| ७०. | ११८ दर्यापूर | श्री. अशोक गावंडे | अमरावती |
| ७१. | ११९ मेळघाट | श्री. जानु सावरकर | |
| ७२. | १२० अचलपूर | डॉ. सुरेश ठाकरे | |
| ७३. | १२१ मोर्शी | सौ. शोभा कोल्हे | |
| ७४. | १२२ तिवसा | श्री. संजय कोल्हे | |
| ७५. | १२३ वलगाव | श्री. श्रीकांत तराळ | |
| ७६. | १२४ अमरावती | श्री. जयकिशोर करवा | |
| ७७. | १२५ बडजेरा | श्री. प्रकाश इंझलवार | |
| ७८. | १२६ चादूर | श्री. नंदकुमार खेरडे | |
| ७९. | १२७ आर्वी | डॉ. वसंतराव गुल्हाणे | वर्धा |
| ८०. | १२८ पुलगाव | सौ. सरोज काशीकर | |
| ८१. | १२९ वर्धा | श्री. किशोर माथनकर | |
| ८२. | १३० हिंगणघाट | श्री. शरद जोशी | |
| ८३. | १३१ उमरेड | श्री. केशवराव गोडे | नागपूर |
| ८४. | १३२ कामठी | श्री. माणिकराव वैद्य | |
| ८५. | १३३ उ. नागपूर | डॉ. सुभाष शामकुँवर | |
| ८६. | १३४ पू. नागपूर | डॉ. रमेश सिंगम् | |
| ८७. | १३५ द. नागपूर | श्री. दिनेश येवले | |
| ८८. | १३६ मध्य नागपूर | श्री. वल्लभदास हेडा | |
| ८९. | १३७ प. नागपूर | श्री जाल पी. गिमी | |
| ९०. | १३८ कळमेश्वर | श्री. विष्णुपंत वानखेडे | |
| ९१. | १३९ काटोल | श्री. राम नेवले | |
| ९२. | १४० सावनेर | श्री. भुजंगराव ढोरे | |
| ९३. | १४१ रामटेक | श्री. बालचंद्र दारोडे | |
| ९४. | १४२ तुमसर | श्री. नानाजी सेलोकर | भंडारा |
| ९५. | १४३ भंअरा | श्री. विनायक चकोले | |
| ९६. | १४४ अड्याळ | श्री. सुरेश धाबेकर | |
| ९७. | १४५ तिरोडा | श्री. विजय भालेकर | |
| ९८. | १४६ गोंदिया | सौ. कांताबाई तिघरे | |
| ९९. | १४७ गोरेगाव | श्री. चनक कावळे | |
| १००. | १४८ आमगाव | सौ. रंजनाबाई रहांगडाले | |
| १०१. | १४९ साकोली | सौ. वंदना उरकुटे | |
| १०२. | १५० लाखांदूर | श्री. अविनाश ब्राह्मणकर | |
| १०३. | १५१ आरमोरी | श्री. राजेंद्रसिंह ठाकोर | गडचिरोली |
| १०४. | १५२ गडचिरोली | श्री. सीताराम ताराम् | |
| १०५. | १५३ सिरोंचा | श्री. भारत मडावी | |
| १०६. | १५४ राजुरा | ॲड. वामनराव चटप | चंद्रपूर |
| १०७. | १५५ चंद्रपूर | ॲड. वामनराव लोहे | |
| १०८. | १५६ सावली | श्री. निरंजन तायडे | |
| १०९. | १५७ ब्रह्मपुरी | ॲड. नीळकंट मोरांडे | |
| ११०. | १५८ चिमूर | श्री. रघुनाथ सहारे | |
| १११. | १५५ भद्रावती | ॲड. मोरेश्वर टेमुर्डे | |
| ११२. | १६० वणी | श्री. रुखमांगद खाडे | यवतमाळ |
| ११३. | १६१ राळेगाव | श्री. रामदास अत्राम | |
| ११४. | १६३ यवतमाळ | सौ. संध्या इंगोले | |
| ११५. | १६४ दारव्हा | श्री. नितीन मोहोड (देशमुख) | |
| ११६. | १६५ दिग्रस | श्री. शंकरराव वानखेडे | |
| ११७. | १६६ पुसद | श्री. अविनाश पोळकट | |
| ११८. | १६७ उमरखेड | श्री. नागोराव कदम | |
| ११९. | १६८ किनवट | श्री. विठ्ठल जाधव | नांदेड |
| १२०. | १६७ हादगाव | श्री. शिवाजी शिंदे | |
| १२१. | १७० नांदेड | श्री. उत्तमराव कदम | |
| १२२. | १७१ मुदखेड | श्री. माणिकराव राजेगोरे | |
| १२३. | १७२ भोकर | श्री. हनुमंतराव सोळंके | |
| १२४. | १७३ बिलोली | श्री. शरद जोशी | |
| १२५. | १७४ मुखेड | श्री. गुणवंत पाटील (हंगर्गेकर) | |
| १२६. | १७५ कंधार | श्री. शंकर धोंडगे | |
| १२७. | १७६ गंगाखेड | श्री. माणिक कांबळे | परभणी |
| १२८. | १७७ शिंगणापूर | श्री. माणिकराव पवार | |
| १२९. | १७८ परभणी | श्री. रंगनाथ चोपडे | |
| १३०. | १७९ बसमत | श्री. प्रभाकर चव्हाण | |
| १३१. | १८० कळमनुरी | श्री. बेगडराव गावंडे | |
| १३२. | १८१ हिंगोली | श्री. उत्तमराव वाबळे | |
| १३३. | १८२ जिंतूर | श्री. शिवाजीराव देशमुख | |
| १३४. | १८३ पाथरी | श्री. गोविंद जोशी | |
| १३५. | १८४ परतूर | श्री. रावसाहेब खंदारे | जालना |
| १३६. | १८५ अंबड | श्री. बन्सीधर हातोटे | |
| १३७. | १८६ जालना | श्री. रघुनाथ गोल्डे | |
| १३८. | १८७ बदनापूर | श्री. अप्पासाहेब कदम | |
| १३९. | १८९ सिल्लोड | श्री. हंसराज कटारिया | औरंगाबाद |
| १४०. | १९० कन्नड | श्री. मच्छींद्र काळे | |
| १४१. | ६९१ वैजापूर | श्री. गंगाधर कदम | |
| १४२. | १९२ गंगापूर | श्री. लक्ष्मणराव झिंजुर्डे | |

| अ.क्र. | मतदार संघ | उमेदवाराचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| १४३. १९३ | औरंगाबाद (पश्चिम) | डॉ. मानवेंद्र काचोळे | |
| १४४. १९४ | औरंगाबाद (पूर्व) | श्री. पुंडलिक उकर्डे | |
| १४५. १९५ | पैठण | श्री. फकीरचंद नवले | |
| १४६. १९७ | माजलगाव | श्री. गंगाधर गायकवाड | बीड |
| १४७. १९९ | आष्टी | श्री. नागनाथ शिंदे | |
| १४८. २०० | चौसाळा | श्री. जालिंदर देशमुख | |
| १४९. २०१ | केज | श्री. अशोक चौहान | |
| १५०. २०२ | रेणापूर | श्री. सूर्यकांत चव्हाण | |
| १५१. २०३ | अहमदपूर | श्री. लक्ष्मणराव वंगे | लातूर |
| १५२. २०४ | उदगीर | श्री. राजकुमार मजगे | |
| १५३. २०५ | हेर | श्री. शिवराज तोंडचिरकर | |
| १५४. २०६ | लातूर | श्री. जयंत वैद्य | |
| १५५. २०७ | औसा | ॲड. त्र्यंबक शिंदे | |
| १५६. २०८ | निलंगा | श्री. पाशा पटेल | |
| १५७. २०९ | कळंब | श्री. ए. पी. कदम | उस्मानाबाद |
| १५८. २१८ | पराडा | श्री. बसलिंग विश्वेकर | |
| १५९. २११ | उस्मानाबाद | श्री. विश्वास हाऊळ | |
| १६०. २१३ | तुळजापूर | श्री. वासुदेव कुलकर्णी | |
| १६१. २१४ | अक्कलकोट | श्री. चंद्रकात स्वामी | सोलापूर |
| १६२. २१५ | सोलापूर(द) | श्री. एल्. जी. पोतदार | |
| १६३. २१६ | सोलापूर शहर (द) | श्री. अख्तरताज पाटील | |
| १६४. २१७ | सोलापूर शहर (उ) | ॲड. अरविंद आंदोरे | |
| १६५. २१९ | मंगळवेढा | श्री. हिरमेठ | |
| १६६. २२० | मोहोळ | ॲड. नागनाथ पारगुंडे | |
| १६७. २२१ | बार्शी | श्री. शहाजी पाटील | |
| १६८. २२२ | माढा | श्री. बबन केचे | |
| १६९. २२४ | सांगोले | श्री. नागेश जोशी | |
| १७०. २२५ | माळशिरस | श्री. बाबुराव शेट्ये | |
| १७१. २२६ | करमाळा | श्री. हिरदास रोकडे | |

| अ.क्र. | मतदार संघ | उमेदवाराचे नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| १७२. २७ | कर्जत | श्री. राधाकृष्ण काळे | अहमदनगर |
| १७३. २२८ | श्रीगोंदा | श्री. अनिल धनवट | |
| १७४. २२९ | अहमदनगर (द) | श्री. अरुण बसापुरे | |
| १७५. २३१ | पाथर्डी | श्री. महादेव केळकर | |
| १७६. २३३ | श्रीरामपूर | श्री. भास्कर थोरात | |
| १७७. २३४ | शिर्डी | श्री. सुभाष चोळके | |
| १७८. २३५ | कोपरगाव | श्री. भास्करराव बोरावके | |
| १७९. २३६ | राहूरी | ॲड. रावसाहेब करपे | |
| १८०. २३८ | संगमनेर | श्री. बाळासाहेब शिंदे | |
| १८१. २४० | जुन्नर | श्री. देवराम शिंदे | पुणे |
| १८२. २४१ | आंबेगाव | श्री. मारुती पोखरकर | |
| १८३. २४२ | खेड आळंदी | श्री. प्रभाकर जाधव | |
| १८४. २४५ | हवेली | श्री. बाळासाहेब यादव | |
| १८५. २६२ | वाई | श्री. शिवाजी गायकवाड | सातारा |
| १८६. २६३ | जावळी | श्री. गुलाबराव सणस | |
| १८७. २६४ | सातारा | श्री. जयसिंग इंदलकर | |
| १८८. २६८ | शिराळा | श्री. बळवंत खोत | सांगली |
| १८९. २६९ | वाळवा | श्री. रघुनाथ पाटील | |
| १९०. २०७ | शिरोळ | श्री. अजित नरदे | कोल्हापूर |
| १९१. २०८ | इचलकरंजी | डॉ. किसन पाटील | |
| १९२. २०९ | वडगाव | श्री. दशरथ खाबडे | |
| १९३. २८० | शाहूवाडी | श्री. अशोक पोवार | |
| १९४. २८१ | पन्हाळा | श्री. शामराव मोरे | |
| १९५. २८२ | सांगरूळ | श्री. बाबुराव मगदूम | |
| १९६. २८४ | कोल्हापूर | श्री. भगवान काटे | |
| १९७. २८५ | करवीर | श्री. खंडेराव घाटगे | |
| १९८. २८७ | गडहिंग्लज | सौ. सुजाता देसाई | |
| १९९. २८८ | चंदगड | श्री. मारुती देसाई | |

**मोरेश्वर टेमुर्डे,** संयोजक, स्वतंत्र भारत पक्ष, महाराष्ट्र

## सरकार यही समस्या है ।

आजपर्यंत जिथं जिथं समस्या असेल तिथं तिथं सरकारचे हात बळकट करा असं म्हटलं जायचं. यापुढं जिथं जिथं सरकारचा हस्तक्षेप असेल तिथं तिथं सरकारचे हात छाटून टाका असा कार्यक्रम जनतेने घ्यायला हवा. ....

.... आपले उद्दिष्ट नेहरूवादी व्यवस्थेची डागडुजी नाही. कारण ते देशाच्या हलाखीवरचे उत्तर नाही. व्यवस्थाच उधळून द्यावी लागेल व तीही सहा महिन्यात उधळून द्यावी लागेल.

**— शरद जोशी**

# संघटना पाईक मारोती नमलेची हत्या ?

## इंडियन वसाहतवाद्यांचे क्रौर्य

शेतकरी संघटनेने इंडिया शासनाच्या, शेतकऱ्यांनाच नव्हे तर सर्वच उद्योजक व व्यावसायिक घटकांना लुटण्याच्या समाजवादी धोरणावर गेल्या पंधरा वर्षांत ढळढळीत प्रकाशझोत टाकल्यामुळे इंडियावर राज्य करणारे काळे इंग्रज बेचैन झाले आहेत. शेतकऱ्यांवर उणे बहात्तर टक्के सबसिडी लादण्याच्या केंद्र सरकारच्या वाणिज्य मंत्रालयाने दिलेल्या कबुलीजबाबमुळे तर हे काळे इंग्रज आणि त्यांचे हस्तक मोठे पेचात सापडले आहेत. इतके दिवस खोट्या शपथा घेऊन आणि खोटी आश्वासने देऊन निवडून येण्याची युक्ती साधलेल्या या वसाहतवाद्यांवर स्वतंत्र भारत पक्षाच्या 'खोटी शपथ घेणार नाही, खोटी आश्वासने देणार नाही' या ठाम भूमिकेमुळे तर कठीण प्रसंग गुदरला आहे. कायदे त्यांचेच आहेत, त्यामुळे त्यांतील पळवाटा त्यांना माहित आहेत; पण शेतकरी संघटनेने प्रदीर्घ प्रशिक्षणाने तयार केलेल्या शेतकऱ्यांसमोर येण्याची त्यांना भीती वाटत आहे. यावर उपाय म्हणून या वसाहतवाद्यांनी ग्रामीण भागात दहशत निर्माण करण्याचे तंत्र अवलंबिले आहे.

नांदेड जिल्ह्याच्या देगलूर तालुक्यातील तमलूर या गावी घडलेली घटना म्हणजे इंडियन वसाहतवाद्यांच्या या तंत्राचा पुरावाच म्हणावा लागेल.

घटना आहे १२ जानेवारी १९९५ ची. शेतकरी संघटनेचे नेते श्री. शरद जोशी यांनी बिलोली मतदार संघातून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी बिलोली येथे १२ डिसेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखला केला. बळीराज्यासाठी चाललेल्या या लढाईतील या विशेषप्रसंगी बिलोली मतदार संघातील सुमारे १५ हजार पायदळ शेतकरी सैनिक गावागातून बिलोली येथे जमा झाले होते. यावेळी झालेल्या सभेनंतर सर्व शेतकरी आपापल्या गावी पायी परत निघाले. या सैनिक दलापैकी देगलूर तालुक्यातील शेळगाव येथील शंभरेक सैनिकांच्या तुकडीचा रस्ता तमलूर या गावावरून जातो. तमलूर येथे त्यावेळी इंडियाचे सरदार श्री. भास्करराव पाटील खतगावकर यांची सभा चालू होती. रस्त्यावरून चाललेले शेतकरी संघटनेचे सैनिक आत शिरले आणि त्यांनी आपल्या सरदारांवर त्यांचे विचारशस्त्र रोखून प्रश्नांच्या फैरी झाडल्या तर आपले सरदार आणि आपण सगळेच मोठ्या कोंडीत सापडू अशी भीती वाटून श्री. खतगावकरांच्या फौजेने घोषणा देऊन आरडाओरडा सुरू केला. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनीही आपल्या घोषणा दिल्या. काही काळाच्या घोषणायुद्धानंतर सभेसाठी जमलेल्या लोकांनी रस्त्याने जाणाऱ्या या शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांवर हल्ला करून जबरदस्त मारहाण केली. या मारहाणीत संघटनेचा एक कार्यकर्ता जमिनीवर पडलेला पाहिल्यानंतरच हल्लेखोर भानावर आले. जमिनीवर पडलेला कार्यकर्ता मारोती नमले मृत्यु पावला आहे हे पाहातच सरदार आणि त्यांच्या फौजेचे धाबे दणाणले आणि पुन्हा एकदा इंडियाच्या पाताळयंत्री यंत्रणेची चाके फिरू लागली. शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिलेली तक्रार पोलिस नोंदवून घेईनात; पण इकडे मात्र मारोती नवलेच्या वडिलांना ताब्यात घेऊन 'आपल्या मुलाला फेफरे आल्यामुळे मृत्यु आला' असे वदवून घेतले' तशी कागदपत्रे बनू लागली.

पण, नंतर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या आग्रही मागणीमुळे पोलिसांना अखेर या प्रकरणातील शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी दिलेली तक्रार नोंदवून घेणे भाग पडले. निवडणुकीसारख्या नाजूक परिस्थितीत अडकलेल्या पुढाऱ्यांचा हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न चालूच आहे. नुकतेच एक पत्रकार परिषद घेऊन त्या परिषदेत मारोती नमलेच्या वडिलांच्या तोंडून 'माझ्या मुलाचा धनुर्वाताने मृत्यु झाला' असे खतगावकर-सरदारांनी असे वदवून घेतल्याचे समजते.

आधी फेफरे, आता धनुर्वात, पुढे काय काय कोण जाणे –

ही वार्ता कळताच, शरद जोशींनी आपली सर्व कामे बाजूला ठेवून शेळगाव येथे जाऊन मारोती नमलेच्या वडिलांचे व कुटुंबियांचे सांत्वन केले. या वेळी जमलेल्या शेतकरी संघटनेच्या शेकडो कार्यकर्त्यांसमोर मारोती नवलेला श्रद्धांजली वाहिली व 'विरोधकांनी कितीही तोल सोडला तरी शेतकरी संघटनेच्या पाईकांनी आपला तोल ढळू देऊ नये' असे सर्वांना आवाहन केले.

●

---

# समाजवादाचे ओझे फेकून द्या

गांधीहत्येचा फायदा हिंदुत्ववाद्यांना मिळाला नाहीच, तो समाजवादी सरकारवाद्यांना मिळाला ही इतिहासाची साक्ष आहे. नेहरूंच्या धोरणांचं कौतुक करणाऱ्यांच्या देशभक्तीविषयी शंका घेतली पाहिजे. परिस्थिती सुधारायची असेल तर गेल्या पन्नास वर्षांचं समाजवादाचं, नेहरूवादाचं ओझं फेकून दिलं पाहिजे.

**– शरद जोशी**

---

(पान ५ वरून)

### शरद जोशींचा प्रचारदौरा

दिनांक २३ जानेवारी १९९५ पासून शरद जोशींचा महाराष्ट्रप्रचार दौरा सुरू झाला. त्यांचा जिल्हावार दिनक्रम पुढीलप्रमाणे – कोल्हापूर, सांगली (२३ जानेवारी), सोलापूर (२४), उस्मानाबाद, बीड (२५), लातूर (२६), नांदेड (२७), यवतमाळ (२८), चंद्रपूर (२९), गडचिरोली, भंडारा (३०), नागपूर (३१), वर्धा (१ फेब्रुवारी), अमरावती (२), अकोला (३), बुलढाणा (४), परभणी-जालना (५), औरंगाबाद, जळगाव (६), धुळे, नाशिक (७), नाशिक (८), अहमदनगर (९), सातारा (१०)

●

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 30 January 1995

To

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
January 6-21, 1995

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

# स्वतंत्र भारत पक्षाने आपले काम केले आहे....

# ....आता काम तुमचे आहे

**आमचे पहिले वचन आम्ही पूर्ण केले आहे –**

स्वतंत्र भारत पक्षाच्या जाहिर आवाहनाला आपण भरघोस पाठिंबा दिला. त्यामुळे या विधानसभा निवडणुकीत आम्ही प्रत्येक मतदारसंघात स्वच्छ चारित्र्याच्या कर्तृत्ववान व्यक्तीला उमेदवार म्हणून आपल्यासमोर आणतो आहोत.

**स्वतंत्र भारत पक्ष**

★ कायद्याचे राज्य पुनर्स्थापित करणे;

★ लायसेन्स्-परमिट-कोटा व्यवस्थेमुळे बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा आणि अकार्यक्षमतेचा बीमोड करणे;

★ गोरगरीबांच्या छातीवर बसलेल्या व्यवस्थेला खाली खेचून त्यांची मुक्तता करणे;

★ लोकांचे हरवलेले स्वातंत्र्य पुनर्प्रस्थापित करणे.

यासाठी वचनबद्ध आहे.

**आमच्याकडे –**

– प्रचाराचे ढोल वाजविण्यासाठी इतरांकडे असलेली पैशाची मस्ती नाही आणि तो आमचा मार्गही नाही;

– आम्हाला यासाठी ना निवडणूक आयोगाची मान्यता, ना समान चिन्हाची सोय. मग मतदार याद्या, टीव्ही, रेडिओ वगैरे प्रसारमाध्यमांचा वापर या गोष्टी तर दूरच;

**का ठाऊक आहे?**

कारण, स्वतंत्र भारत पक्षाने खोटा दस्तऐवज करण्याचे नाकारले; ज्या समाजवादाचे सर्व जगात दिवाळे वाजले आणि ज्या समाजवादाने आपल्या देशाचा विद्ध्वंस केला त्यावर निष्ठा असल्याची खोटी शपथ घेण्यास साफ नकार दिला;

– तरीही सर्व संकटे व अडचणी सोसून स्वतंत्र भारत पक्ष उभा ठाकला आहे.

- **आमची भिस्त आहे तुमच्या सुजाणतेवर.**
- **मत देतांना स्वतंत्र भारत पक्षाने पाठिंबा दिलेला उमेदवार ओळखा आणि सचोटीला मते द्या, राखीव खूण शोधत बसू नका.**
- **आपण महाराष्ट्राची धुरा आमच्यावर सोपवलीत तर कालबद्ध कार्यक्रमाची महाराष्ट्रापासून सुरवात करू या आणि देश वाचवू या.**

**स्वतंत्र भारत पक्ष ● स्वच्छ विचार ● स्पष्ट भाषा**

६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.
प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता
अंगारमळा, मु. पो. आंबेठाण (४१० ५०१)
ता. खेड, जि. पुणे.

संपादक, मुद्रक, प्रकाशक
सुरेशचंद्र म्हात्रे
फोन : द्वारा - चाकण ५२३५४/५२४६८
एस्.टी.डी.- ०२१३५

पाक्षिक शेतकरी संघटक
मालक – मोहन बिहारीलाल परदेशी
मुद्रण स्थळ – गणेश प्रिंटर्स,
६९३, बुधवार पेठ, पुणे - २.